**जिल्हा नियोजन समिती कार्यालयांनी नियोजन विभागात पत्रव्यवहार करताना ई-ऑफिस प्रणालीच्या माध्यमातून पत्रव्यवहार करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**नियोजन विभाग**
**शासन परिपत्रक क्र.डीएपी-१०२६/प्र.क्र.१२/का.१४८१**
(ई क्र.- १५३८७०२)
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक - १७ मार्च, २०२६.

**वाचा**:- १) सामान्य प्रशासन (माहिती व तंत्रज्ञान उपविभाग) यांचे शासन परिपत्रक क्रमांक: मातंसं-२०१२/ प्र.क्र.२५३/का.३९, दिनांक ०९ नोव्हेंबर,२०२०.
२) सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण-२०२३/प्र.क्र.०२/१८ (र.व का.), दिनांक ०२ फेब्रुवारी,२०२३ .

**परिपत्रक:-**

सामान्य प्रशासन (माहिती व तंत्रज्ञान उपविभाग) वाचा क्र. १ येथील शासन परिपत्रकान्वये शासकीय कामकाजात संगणकाचा अधिकाधिक वापर करून शासकीय कामकाज गतिमान व्हावे, कामकाजात सुसूत्रता यावी, दस्तऐवज व माहिती सुरक्षित, त्वरेने व जलद गतीने प्राप्त होऊन निर्णय प्रक्रिया सुलभ व्हावी या करीता ई-ऑफिस प्रणालीच्या कार्यपद्धतीबाबत सूचना दिल्या आहेत.

२. सामान्य प्रशासन विभागाने वाचा क्र. २ येथील शासन परिपत्रकान्वये मंत्रालयीन विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयांमध्ये प्राप्त होणाऱ्या टपालांवर तात्काळ कार्यवाही व्हावी व वेळेचा अपव्यय होऊ नये याकरीता दिनांक ०१ फेब्रुवारी,२०२३ पासून मंत्रालयातील सर्व प्रशासकीय विभागात तसेच क्षेत्रीय कार्यालयांतील पत्रव्यवहार करताना प्रत्येक टपाल ई-ऑफिस माध्यमातून पाठविण्याच्या सूचना दिल्या आहेत.

३. नियोजन विभागात जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, यांच्याकडून जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण), आमदार स्थानिक विकास कार्यक्रम, खासदार स्थानिक विकास कार्यक्रम, डोंगरी विभाग विकास कार्यक्रम तसेच अन्य विषयाबाबत पत्रव्यवहार करण्यात येतो. सदर पत्रव्यहाराद्वारे नियोजन विभागात सादर करण्यात येणारे प्रस्ताव ई-ऑफिसच्या माध्यमातून सादर केल्यास कामकाजात सुसूत्रता, दस्तऐवज व माहिती सुरक्षित, त्वरेने व जलद गतीने प्राप्त होऊन निर्णय प्रक्रियेत सुलभता येण्यास मदत होईल. त्यामुळे जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती यांनी नियोजन विभागात पत्रव्यवहार करताना प्रत्येक टपाल/प्रस्ताव ई-ऑफिस माध्यमातून पाठविण्याकरीता खालील कार्यपद्धतीचे काटेकोर पालन करावे.

(१) जिल्हा नियोजन समिती कार्यालयांनी नियोजन विभागास पत्रव्यवहार करताना, प्रत्येक टपाल/प्रस्ताव त्यासोबतची आवश्यक कागदपत्रे इ. ई-ऑफिस माध्यमातून (Receipt स्वरुपात) जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव जिल्हा नियोजन समिती यांच्या स्वाक्षरीने अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव व विकास आयुक्त, नियोजन विभाग यांना सादर करावेत. जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती यांच्या व्यतिरिक्त जिल्हा स्तरावरील अन्य अधिकाऱ्यांनी नियोजन विभागात ई-ऑफिस माध्यमातून टपाल/प्रस्ताव सादर करू नये.

(२) जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती यांनी वरीलप्रमाणे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव व विकास आयुक्त, नियोजन विभाग यांच्याकडे ई-ऑफिसच्या माध्यमातून पत्रव्यवहार करताना, प्रत्येक टपाल/प्रस्ताव त्यासंदर्भातील प्रचलित शासन निर्णय, आदेश, परिपत्रक, मार्गदर्शक सूचना यातील तरतुदीच्या आधारे सर्वकष छाननी करून त्यांच्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह सादर करावा.

(३) शासकीय कामकाजात ई-ऑफिस प्रणालीचा प्रभावीपणे वापर करावयाचा असल्याने, जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती यांनी नियोजन विभागात पत्रव्यवहार करताना, टपाल/प्रस्ताव ई-मेल, व्हॉट्स ॲपद्वारे सादर करू नये.

(४) नियोजन विभागातील अधिकारी/ कर्मचारी यांनी जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती यांच्याकडून ई-ऑफिस प्रणालीव्दारे Receipt स्वरुपात प्राप्त झालेल्या प्रस्तावांवर ई-ऑफिस प्रणालीमार्फतच कार्यवाही करावी.

राज्यातील सर्व जिल्हा नियोजन समिती कार्यालयांनी शासनास प्रस्ताव सादर करताना वरील कार्यपध्दतीचे काटेकोर पालन करणे आवश्यक राहील. याची कृपया नोंद घ्यावी.

सदर शासन परिपत्रक शासनाच्या www.maharashtra.gov.in या संगणक संकेतस्थळावर उपलब्ध असून त्यांचा संगणक सांकेतांक २०२६०३१७१७३१००९४१६ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

NITIN BHANUDAS KHEDKAR

Digitally signed by NITIN BHANUDAS KHEDKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PLANNING DEPARTMENT,
2.5.4.20=99977b58556463dbb2db463cec9482d13f7661ed3b2a95e83e386485fff4c21e, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=CFCA827F49093860DB8AA4627DA10E31F82BD40A9631D2E01EC212A473A6BCA2, cn=NITIN BHANUDAS KHEDKAR
Date: 2026.03.17 17:32:39 +05'30'

**( नि. भा. खेडकर )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई.
२. मा.उपमुख्यमंत्री (नगर विकास ), यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.उपमुख्यमंत्री (राउशु) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा.पालकमंत्री तथा अध्यक्ष, जिल्हा नियोजन समिती (सर्व जिल्हा) (जिल्हा नियोजन समिती कार्यालयामार्फत).
५. मा.राज्यमंत्री (नियोजन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. विभागीय आयुक्त (सर्व)
८. जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती (सर्व).
९. आयुक्त, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई.
१०. जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा नियोजन समिती (सर्व).
११. नियोजन विभागातील सर्व सह/उप सचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी.
१२. निवड नस्ती.